अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १० मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १६० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## जिल्हा परिषद गटनेतापदासाठी लॉबिंगला वेग

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्हा परिषदेत भाजपला एकहाती बहुमत मिळाले असले तरी गटनेतापदाच्या निवडीवरून पक्षांतर्गत जोरदार लॉबिंग सुरू झाल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषद अध्यक्षांची निवड १८ मार्च रोजी होणार असून त्यापूर्वी गटनेता निवडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र अद्यापही पक्षाला गटनेता निश्चित करता आलेला नाही.

**आज नाव जाहीर होणार**

मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी गटनेत्याची निवड होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर इच्छुकांकडून हालचाली वाढल्या असून पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधला जात आहे. दरम्यान, बार्शी तालुक्यातील उपळाई ठोंगे गटातून निवडून आलेले धनगर समाजातील दीपक वैद्य यांचे नाव सध्या आघाडीवर असल्याची माहिती आहे.

जि.प. अध्यक्षपदाचा उमेदवार १८ मार्च रोजी ठरणार आहे. बार्शी तालुक्यातील सहाही जि.प. उमेदवार माजी आ. राजेंद्र राऊत यांनी निवडून आणले आहेत. त्यामुळे बार्शी तालुक्याला अध्यक्षपद जाईल, असे वाटत होते. मात्र गटनेते पदाला तालुक्यातील दीपक वैद्य यांचे नाव आघाडीवर असल्याने आता बार्शीला अध्यक्षपद मिळणे अवघड असल्याचे बोलले जात आहे.


# सोलापूरच्या कन्येने स्वीकारला खासदारकीचा बहुमान

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार सोलापूरच्या कन्या डॉ.ज्योती वाघमारे यांनी आई-वडिलांच्या साक्षीने सोमवारी विधानभवनात खासदारकीचे प्रमाणपत्र स्वीकारले. त्यावेळी आनंदाचा मोहोल तयार झाला. या आनंदी क्षणातच त्यांनी छ.शिवाजी महाराज आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन केले.त्याचबरोबर शिवसेनाप्रमुख बाळसाहेब ठाकरे यांच्या चरणीही त्यात नतमस्तक झाल्या.

यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की, आज खूप आनंद होत आहे राज्यसभेचे अधिकृत खासदार झाल्याचे हे पत्र मिळाल्याबरोबर सर्वात आधी विधान भवनाच्या परिसरात असलेल्या छ. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन केले. त्यानंतर चैत्यभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन केले, सिद्धिविनायक येथे जाऊन आलो आणि समस्त शिवसैनिकांचे प्रेरणास्थान असलेल्या स्मृतीस्थळावर आले. इथला प्रत्येक मातीचा कण हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने पेटलेला आहे,

(अधिक वृत्त पान ७ वर...)



मुंबई : प्रा. ज्योती वाघमारे यांनी सोमवारी विधानभवनात आपल्या खासदारकीचे प्रमाणपत्र स्वीकारले. यावेळी त्यांचे आई-वडिल सोबत होते.

### ...आम्ही तलवारीही घेवू शकतो

महिला एकमेकांच्या साथीने जर उभ्या राहिल्या तर त्या काहीही अशक्य ते शक्य करू शकतात. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे सर्व महिलांना रणरागिनी म्हणायचे, अशा या रणरागिणी आहेत. आमच्या शिवसेनेच्या प्रत्येक महिला, प्रत्येक नेत्या आज खासदार म्हणून संसदेत जात आहेत, हा आनंद सगळ्यांना झालेला आहे. या सगळ्या बाळासाहेबांच्या पोरी आहेत, बाळासाहेबांच्या पोरींनी जर ठरवलं तर आम्ही हातात बांगड्या नाही तर तलवारी सुद्धा पेलू शकतो, अशी ही शिवसेना महिला आघाडी आहे, असे म्हणत ज्योती वाघमारे यांनी शिवसेनेच्या महिला आघाडीचे कौतुक केले.

### ज्योती वाघमारेंचा ठाकरेंना टोला

बाळासाहेबांना सुद्धा आज आनंद होत असेल की, आपली शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या हातात सुरक्षित आहे, हा प्रवास सोपा नव्हता. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांच्या रक्ताचे वारसदार आहेत त्यांनी, आजपर्यंत त्यांचा प्रयत्न हा एखाद्या अमराठी महिलेला राज्यसभेवर पाठवण्याचा चालला होता. पण, एकनाथ शिंदे यांनी एका मराठी मुलीला राज्यसभेवर पाठवलं, असे म्हणत नाव न घेता ठाकरेंच्या शिवसेनेवरही टीका केली.

### टीईटीने उघड केली शिक्षणाची वस्तुस्थिती

# जिल्हा परिषदचे केवळ १,२३१ शिक्षकच पास




✔ पंढरपूर/प्रतिनिधी

शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र या परीक्षेत जिल्हा परिषद शिक्षकांची कामगिरी चिंताजनक दिसून आली आहे. सोलापूर जिल्हा परिषदेतील २०७५ शाळांमधील सुमारे ८ हजार ७०० शिक्षकांनी टीईटी परीक्षा दिली, त्यापैकी फक्त १२३१ शिक्षक उत्तीर्ण झाले आहेत.

जिल्हा परिषद शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण व सुविधा कमी असल्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये प्रवेश देत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या वर्षागणिक घटत चालली आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शासनाने शिक्षकांना टीईटी परीक्षा बंधनकारक केली आहे.

२०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी ही परीक्षा पूर्वी बंधनकारक नव्हती. मात्र १ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ५३ वर्षांखालील सर्व शिक्षकांना दोन वर्षांत टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांनी टीईटी परीक्षा दिली. ८ हजार ७०० शिक्षकांपैकी १२३१ शिक्षकच पास झाल्याने शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, नापास झालेल्या शिक्षकांना नोकरी टिकवण्यासाठी टीईटी परीक्षा देण्यासाठी सहा वेळा संधी देण्यात येणार आहे. तरीही परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास संबंधित शिक्षकांवर सेवा निवृत्तीची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### दर्जेदार शिक्षण देण्याचा मुद्दा

निकालामुळे दर्जेदार शिक्षण देण्याचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागातील अनेक शिक्षक मोठे पगार घेत असूनही परीक्षा पास होत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षकांची गुणवत्ता आणि जबाबदारी वाढवणे ही काळाची गरज बनली आहे. ग्रामीण शाळांमध्ये आधुनिक साधने आणि योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा आवश्यक आहेत. ग्रामीण शिक्षण मजबूत झाले तरच समाज आणि देशाचा विकास खऱ्या अर्थाने होईल.

# युद्धाची झळ संभाजीनगरातील अनेक उद्योग व्हेंटिलेटरवर

✔ छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

**अमेरिका-इस्त्रायलच्या विध्वंसक हल्ल्यात इराणमधील अनेक शहरे, तेल तसेच गॅससाठ्यांवर आगीच्या ज्वाला भडकत आहेत. त्याची झळ आता महाराष्ट्रालाही बसू लागली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅसचा पुरवठा कमी होवू लागल्याने त्याचा परिणाम उद्योग संस्थांवर होवू लागला आहे. गॅसअभावी मराठवाड्याची राजधानी छ.संभाजीनगरमधील अनेक उद्योगांना घरघर लागली असून ५ उद्योग बंद ठेवावे लागले आहेत. त्यामुळे उद्योजक आणि तिथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे**



युद्धाचा परिणाम जगभरातील देशांवर होत असून भारतातील इंधन पुरवठ्यावरही त्याचा परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केंद्र सरकारचा संदर्भ देत इंधन पुरवठा कमी होणार नाही, मुबलक गॅस पुरवठाही असल्याचे म्हटले आहे. मात्र, छ. संभाजीनगरमध्ये ५ मोठे उद्योग गॅस अभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. गॅसचा तुटवडा कायम राहिल्यास उद्या मोठ्या प्रमाणात उद्योग बंद होतील. ऑटो इंडस्ट्री, फार्मा कंपनीला मोठा फटका बसू शकतो. चेंबर ऑफ मराठवाडा अँड ॲग्रीकल्चर संघटनेने महायुतीच्या सरकारला पत्र धाडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे याकडे लक्ष वेधले आहे.

छ. संभाजीनगर ऑटो इंडस्ट्रीला गस टंचाईचा मोठा फटका बसतोय.गॅस संपल्यामुळे ५ मोठे उद्योग बंद करण्याची वेळ उद्योजकांवर आली आहे. उद्या याचा फटका मोठ्या प्रमाणात बसेल. त्यातून आणखी उद्योग बंद होतील. ऑटो इंडस्ट्री, फार्मा कंपनी, स्टील कंपनींना मोठा फटका बसतोय. संभाजीनगर नगर उधोगाला रोज २५० ते ३०० मेट्रिकटन गॅसची गरज आहे. गॅस पुरवठा पूर्ण बंद आहे. त्यामुळे फडणवीस यांना (चेंबर ऑफ मराठवाडा अँड ॲग्रीकल्चर) संघटनेने पत्र लिहून मदतीची मागणी केली, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष उत्सव मंचर यांनी दिली.

संभाजीनगरमधील शेंद्रा, वाळूज, चिखलठाणा येथील ऑटोमोबाईल इंडस्ट्रींत गॅस वापरला जातो, स्टील कंपनीला देखील मोठा गॅस लागतो. मात्र, गेल्या काही दिवसांत गॅसचा पुरवठा घटल्याने काही युनिट बंद होण्याच्या मार्गावर आहेत. एकदा हे युनिट बंद पडल्यास पुन्हा सुरू करणे खूप अडचणीचे असते. उद्योजक फटका बसल्यास, छोटे उद्योजक पूर्ण बंद पडतील, कृषी आणि इतर युनिट आहे जे बंद पडू शकते.... कंपनी बंद पडल्यास त्याला सुरू करण्यास २४ ते ४८ तास लागते, पण यात प्रोसेस सायकल बंद पडते. खूप गंभीर स्थिती आहे, आजची परिस्थिती गंभीर आहे, उद्या तर आणखी गंभीर परिणाम जाणवतील, बजाज ऑटोला पुरवठा करणाऱ्या युनिटला फटका बसणार आहे.

### कोणत्या कंपन्यांमध्ये होतो गॅसचा वापर

- स्टील आणि इंजिनिअरिंग उद्योग
- ऑटो कॉम्पोनंट्स उत्पादन
- फार्मास्युटिकल कंपन्या
- ब्रुअरीज आणि फूड प्रोसेसिंग
- सिरॅमिक्स आणि ग्लास उद्योग
- उत्पादन प्रक्रियेत वापरले जाणारे बॉयलर आणि थर्मिक फ्लुइड हीटर्स

### ४० ते ५० लघुउद्योगही बंद

गॅसचा तुटवडा झाल्याने संभाजीनगरमधील ४० ते ५० लघुउद्योगही बंद करण्यात आले असून पावडर कोटिंग, फोर्जिंग, केमिकल यासह इतर लघुउद्योग बंद झाले आहेत. संभाजीनगर मध्ये ४ हजार ५०० लघू उद्योग आहेत, अशी माहिती मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चरचे (मासिया) अध्यक्ष अर्जुन गायकवाड यांनी दिली.

सोलापूर शहराचे **तापमान**

कमाल तापमान **३९.४**

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे





बॉम्ब तिकडे पडतात आणि चटके इथे लागतात !

कल्याण
890-70-127

मुंबई
270-94-356

0 2 7

# भर सभागृहात सत्ताधारी पक्षात रंगली जुगलबंदी...

## आ. मुनगंटीवार यांचा टोला, मंत्री शेलारांचा प्रतिटोला

✔ मुंबई/प्रतिनिधी

सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. त्यादरम्यान विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहात विविध विषयांवरून सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि विरोधी पक्षाच्या आमदारांमध्ये आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळतात. मात्र, सत्ताधारी पक्षातील आमदारांमध्ये खडाजंगी झाल्याचे सोमवारी पहायला मिळाले. भारतीय जनता पक्षाचे नेते तथा आमदार सुधीर मुनगंटीवार आणि भारतीय जनता पक्षाचे नेते तथा मंत्री आशिष शेलार यांच्यात चांगलीच जुगलबंदी रंगल्याचं पाहायला मिळालं.



आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांच्या भरती परीक्षांच्या मुद्यांवरून सरकारला काही प्रश्न विचारले. यावेळी बोलताना सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्री आशिष शेलार यांना खोचक टोला लगावला. त्यानंतर प्रश्नांची उत्तरे देताना मंत्री आशिष शेलार यांनीही सुधीर मुनगंटीवार यांना टोला लगावला. त्यामुळे या दोन्ही नेत्यांमध्ये सभागृहात जुगलबंदी रंगल्याचे पाहायला मिळालं.

### तुम्ही चिरंजीवी मंत्री असावेत



''सन्माननीय मंत्री महोदय (आशिष शेलार) अतिशय सकारात्मक पद्धतीने प्रश्नांची उत्तरे देत आहेत. तुमचे उत्तर ऐकल्यावर खरेच तुम्ही चिरंजीवी मंत्री असावेत किंवा त्यापेक्षाही तुम्ही आणखी पुढे जावो, अशा आमच्या तुम्हाला शुभेच्छा आहेत. मात्र, एक गोष्ट लक्षात आली की, भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर तुमचे उत्तर अतिशय सकारात्मक पद्धतीने आले, कारण आज तुम्ही खूश आहात. तुम्ही खूश आहात तर मग आणखी चार ते पाच प्रश्नांची उत्तर अपेक्षित आहेत'', असे म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी भरती परीक्षांच्या मुद्यांवरून मंत्री आशिष शेलार यांना काही प्रश्न विचारले.

### अभिमन्यू सारखा मी चक्रव्युहात अडकणार नाही



सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांच्या भरती परीक्षांच्या मुद्यांवरून विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देताना आशिष शेलार यांनी म्हटले की, ''सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांच्या भरती परीक्षांबाबत तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच हे प्रश्न सभागृहात मांडताना त्यांनी माझी प्रशंसा केली त्याबाबत त्यांचे आभार. तसेच मला पूर्ण विश्वास आहे की, सुधीर मुनगंटीवार यांनी माझी प्रशंसा अगदी मनापासून केली असावी. याबरोबरच मला पूर्ण विश्वास आहे की, त्यांच्या मनात माझ्याविषयी दुसरा कोणताही विषय अकारण असणार नाही. मात्र, या चर्चेमुळे अकारण विषय बाहेर जाऊ नये म्हणून मी चिरंजीवी मंत्री राहील की नाही? हे मला माहिती नाही. पण अभिमन्यू सारखे मी चक्रव्युहात मरून पडणार नाही एवढेच त्यांना सांगतो'', असे म्हणत आशिष शेलार यांनी सुधीर मुनगंटीवार यांना टोला लगावला.